सं.फौ.ख.क्र.१३८०/२०१७.
सरकार वि. देवेंद्रकुमार.
निशाणी क्र. **१० लगत.**

## अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांची साक्ष

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** :– हरीदास भगवानदास खोडके,
**वय** :– ५४ वर्षे, **धंदा** :– नोकरी,
**राहणार** :– पिपळा डाकबंगला, ता. सावनेर, जि. नागपूर.

## सरतपासणी अभियोगपक्षातर्फे – श्री. ए.ए.कोरे, विद्यमान सहा. सरकारी वकील यांच्यामार्फत

मौजे जरीपटका, नागपूर येथील डब्ल्यु.सी.एल. कंपनीमध्ये मी सुरक्षारक्षक या पदावर कार्यरत आहे. प्रस्तुत प्रकरणातील घटना दिनांक २६.०८.२०१७ रोजी दुपारी ३.३० वाजताच्या सुमारास खापरखेडा ते दहेगाव रस्त्यावर मौजे खापरखेडा येथील मिलन चौकाच्या अलीकडे घडली होती. घटनेवेळी मी माझी बजाज विक्रांत मोटरसायकल क्र.एम.एच.–४०/बी.बी.–१००६ या वाहनावरुन मौजे खापरखेडा येथून मौजे दहेगाव येथे येत येतो. घटनास्थळी दोन टिप्पर रस्त्याच्या डाव्या बाजुला उभे होते. दोन्ही टिप्परचा क्रमांक ६१० असा होता. दोन्ही टिप्परचे तोंड दहेगाव गावाकडे होते. मागच्या टिप्परचा क्र.एम.एच.–३१/डी.एस.–६१० असा होता. घटनेवेळी मी सदर रस्त्यावरुन जात असतेवेळी टिप्पर क्र.एम.एच.–३१/डी.एस.–६१० या वाहनावरील चालकाने इंडीकेटर अथवा हाताने इशारा न करता सदर वाहन अचानकपणे रस्त्यावर आडवे केले. त्यामुळे, माझी मोटरसायकल सदर टिप्परला धडकली व त्यामुळे मी खाली पडलो आणि माझी मोटरसायकल सदर टिप्परच्या खाली गेली. त्यामुळे, माझ्या कमरेला व उजव्या हाताला मार लागला. त्यावेळी, आजुबाजूचे लोक घटनास्थळी जमले होते. त्यावेळी, मी सदर वाहनाचा क्रमांकाचा माझ्या मोबाईलमध्ये फोटो घेतला व माझा मित्र सुरेश जोगी याला फोन करुन घटनेबाबत माहिती दिली आणि त्यास घटनास्थळी बोलाविले. तसेच, मी माझा मुलगा संदीप यास फोन करुन घटनेबाबत माहिती दिली आणि त्यास घटनास्थळी बोलाविले. त्यानंतर, मी कुनाल हॉस्पीटल, नागपूर येथे औषधोपचाराकरीता गेलो होतो. सदर दवाखान्यामध्ये मी औषधोपचार घेत असतेवेळी दिनांक २७.०८.२०१७ रोजी पोलीसांनी सदर दवाखान्यात येवून घटनेबाबत माझ्याकडे चौकशी करुन माझी तोंडी तक्रार नोंदवून घेतली होती. आता मला दाखविण्यात आलेली तोंडी तक्रार तिच असुन त्यावर माझी सही आहे व त्यातील संपूर्ण मजकूर खरा व बरोबर आहे. सदर तोंडी तक्रार **निशाणी क्र. १२** वर आहे. सदर तोंडी तक्रारीवरुन उक्त वाहन चालकाविरुध्द छापील प्रथम खबरी अहवाल नोंदविण्यात आला होता. आता मला दाखविण्यात आलेला छापील प्रथम खबरी अहवाल तोच असुन त्यावर माझी सही आहे व त्यातील संपूर्ण मजकूर खरा व बरोबर आहे. सदर छापील प्रथम खबरी अहवाल **निशाणी क्र. १३** वर आहे. दिनांक २९.०८.२०१७ रोजी मला सदर दवाखान्यातून घरी सोडण्यात आले होते. दिनांक ०७.०९.२०१७ रोजी पोलीसांना तपासादरम्यान प्रस्तुत प्रकरणातील घटनास्थळ

मी दाखविले होते. त्यावेळी, पोलीसांनी सदर ठिकाणचा घटनास्थळ पंचनामा तयार केला होता. पोलीसांनी तपासादरम्यान घटनेबाबत माझ्याकडे चौकशी करुन माझे बयान नोंदविले होते. टिप्पर क्र.एम.एच.–३१/डी.एस.–६१० या वाहनास पाहिल्यास सदर वाहनाच्या क्रमांकावरुन मी उक्त वाहन ओळखु शकतो. घटनेवेळी सदर वाहन चालकास मी पाहिल्यामुळे त्यास पाहिल्यास मी ओळखु शकतो. आज रोजी उक्त वाहन चालक म्हणजेच प्रस्तुत प्रकरणातील आरोपी हा न्यायालयात हजर नाही.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे – श्री. एम.सी.खंगारे, विद्यमान वकील यांच्यामार्फत</u>**

०२. घटनास्थळी दोन टिप्पर रस्त्याच्या डाव्या बाजुला उभे होते, ही बाब पोलीसांना तोंडी तक्रार देतेवेळी मी सांगीतली होती. दोन्ही टिप्परचा क्रमांक ६१० असा होता, ही बाब पोलीसांना तोंडी तक्रार देतेवेळी मी सांगीतली होती. दोन्ही टिप्परचे तोंड दहेगाव गावाकडे होते, ही बाब पोलीसांना तोंडी तक्रार देतेवेळी मी सांगीतली होती. घटनेवेळी मी सदर रस्त्यावरुन जात असतेवेळी टिप्पर क्र.एम.एच.–३१/डी.एस.–६१० या वाहनावरील चालकाने इंडीकेटर अथवा हाताने इशारा न करता सदर वाहन अचानकपणे रस्त्यावर आडवे केले, ही बाब पोलीसांना तोंडी तक्रार देतेवेळी मी सांगीतली होती. माझी मोटरसायकल सदर टिप्परच्या खाली गेली, ही बाब पोलीसांना तोंडी तक्रार देतेवेळी मी सांगीतली होती. घटनेवेळी आजुबाजूचे लोक घटनास्थळी जमले होते, ही बाब पोलीसांना तोंडी तक्रार देतेवेळी मी सांगीतली होती. त्यावेळी, मी सदर वाहनाचा क्रमांकाचा माझ्या मोबाईलमध्ये फोटो घेतला, ही बाब पोलीसांना तोंडी तक्रार देतेवेळी मी सांगीतली होती. माझा मित्र सुरेश जोगी याला फोन करुन घटनेबाबत मी माहिती दिली होती, ही बाब पोलीसांना तोंडी तक्रार देतेवेळी मी सांगीतली होती. घटनेवेळी सदर वाहन चालकास मी पाहिले होते, ही बाब पोलीसांना तोंडी तक्रार देतेवेळी मी सांगीतली होती. आता मला माझी तोंडी तक्रार वाचून दाखविण्यात आली. उपरोक्त नमूद बाबी पोलीसांनी माझ्या तोंडी तक्रारीमध्ये का नमूद केल्या नाहीत, याचे कारण मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २७.०८.२०१७ रोजीनंतर पोलीसांनी प्रस्तुत प्रकरणातील घटनेबाबत माझ्याकडे चौकशी केली नव्हती.

०३. हे म्हणणे खरे आहे की, मिलन चौक शेजारी कोल डेपो आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे मिलन चौक येथे बरेच ट्रक उभे असतात. हे म्हणणे खरे आहे की, सदर मिलन चौकाच्या अलीकडे व पलीकडे रस्त्यावर गतिरोधक आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे सदर रस्त्यावर वाहनाचा ताशी वेग १० कि.मी. इतका असतो. हे म्हणणे खरे आहे की, मिलन चौकाच्या अलीकडे व पलीकडे रस्तयावर गतिरोधक असल्याची बाब मला माहिती होती. घटनेवेळी माझा मोटरसायकलचा ताशी वेग २० कि.मी. इतका होता. हे म्हणणे खरे आहे की, एखाद्या वाहनाचा वेग ताशी २० कि.मी. असल्यास सदर वाहन लवकर थांबविता येते. हे म्हणणे खरे नाही की, घटनेवेळी माझे लक्ष रस्त्याकडे नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मोटरसायकलसोबत घडलेली घटना अचानकपणे घडली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मोटरसायकलला झालेल्या अपघातास मी स्वतः कारणीभूत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात कथन केल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे.

हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे सांगत आहे की, घटनेवेळी मी सदर रस्त्यावरुन जात असतेवेळी टिप्पर क्र.एम.एच.–३१/डी.एस.–६१० या वाहनावरील चालकाने इंडीकेटर अथवा हाताने इशारा न करता सदर वाहन अचानकपणे रस्त्यावर आडवे केले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे सांगत आहे की, त्यामुळे माझी मोटरसायकल सदर टिप्परला धडकली व त्यामुळे मी खाली पडलो आणि माझी मोटरसायकल सदर टिप्परच्या खाली गेली. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे सांगत आहे की, त्यामुळे माझ्या कमरेला व उजव्या हाताला मार लागला. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

श्रावणोत्तर स्विकृती
समक्ष

दिनांक –१२.०६.२०१८.

(बाळासाहेब श्री. गायकवाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.२, सावनेर.

**<u>Certificate</u>**

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Stenographer :- Shri. Ishwar G. Sonkusare.